# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री परिसर, गंगापुर धरणाजवळ, नाशिक 422 222

आरोग्य विज्ञान विद्याशाखा

## इतिवृत्त

गुरूवार दिनांक 05/05/2016 रोजी दुपारी 3.30 वाजता आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेची बैठक आरोग्य विज्ञान विद्याशाखा सभागृह येथे आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1) डॉ.जयदिप निकम (संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा)
2) डॉ.राजेंद्र भांबर, प्राचार्य, पंचवटी फार्मसी कॉलेज, नाशिक
3) डॉ.सुरेश महाजन, प्राध्यापक व विभाग प्रमुख. डॉ.वसंतराव पवार वैद्यकिय महावि, नाशिक
4) श्रीमती विद्यत राजहंस, प्राचार्य, एम.ई.एस.कॉलेज ऑफ ऑप्टोमेट्री, पुणे
5) प्रा.राम ठाकर, सहायक प्राध्यापक, निरंतर शिक्षण विद्याशाखा
6) डॉ.अभय पाटील , सहायक प्राध्यापक आरोग्य विज्ञान विद्याशाखा

सदर बैठकीस खालील सदस्य त्यांच्या वैयक्तिक कारणास्तव अनुपस्थित होते.

1) श्रीमती मालती डोंगरे, मेट्रन नर्सिग विभाग, मेयो हॉस्पिटल, नागपुर
2) डॉ.विश्वास सापतणेकर, सापतणेकर हॉस्पिटल, लालबहादुर शास्त्री मार्ग, ठाणे
3) डॉ. प्रमोद खंदारे, सहयोगी प्राध्यापक, संगणकशास्त्र विद्याशाखा
4) डॉ.विजया पाटील, सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
5) प्रा.चेतना कमळस्कर, सहायक प्राध्यापक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा

### विषय पत्रिका

या बैठकीमध्ये पुढील विषयांवर सविस्तर चर्चा होवून ठराव/ शिफारशी करण्यात आल्या, त्या पुढीलप्रमाणे:

**विषय क्रमांक बी-01/2016/01** : दिनांक 13 ऑगस्ट 2015 रोजी झालेल्या आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे....

(टिप्पणी : आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेची या अगोदरची बैठक दिनांक दिनांक 13 ऑगस्ट 2015 रोजी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचे इतिवृत्त सर्व सन्माननीय सदस्यांना पाठविण्यात आले आहे. या बैठकीतील इतिवृत्तास मान्यता मिळण्याची शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडून करण्यात येत आहे)

(सहपत्र क्र. 01)

**ठराव:** : दिनांक 13 ऑगस्ट 2015 रोजी झालेल्या आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त आणि त्यावर केलेले कार्यवृत्त याला मंजुरी देण्यात आली.



Scanned with CamScanner

**विषय क्रमांक बी-01/2016/02** : गोंदिया येथील विदर्भ नेचर क्यूअर सोसायटी संचालित ओशनिक व्हिजन कॉलेज ऑफ सायन्स या अभ्यासकेंद्राच्या चौकशीसाठी नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालावर चर्चा होवून निर्णयार्थ सादर...

**(टिप्पणी** : विदर्भ नेचर क्युअर सोसायटी, गोंदिया (केंद्र संकेतांक-4606A) या अभ्यासकेंद्रास सन 2006 मध्ये B.Sc.(MLT) या शिक्षणक्रमासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अधिकृत अभ्यासकेंद्र म्हणून मान्यता देण्यात आली होती. सदर मान्यता अटिंच्या अधिन राहून देण्यात आली. सदर अट – विद्यार्थ्यांना त्वरित M.D. Pathologist उपलब्ध असलेली लॅबशी जोडलेले असावे तसेच पुरेसे साधनसामुग्री त्वरित उपलब्ध करावे इ. सदर अभ्यासकेंद्रास फक्त 20 विद्यार्थ्यांच्या एका तुकडीस मान्यता अटींच्या अधिन राहून देण्यात आली. परंतु मयार्दपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना नियमबाह्य प्रवेश दिला. दर तीन वर्षांनी अभ्यासकेंद्राचे पुनर्नोदणी करणे आवश्यक असते. ते ही त्यांनी अद्यापपावेतो केलेले नाही. तसेच इतरही गंभीर बाबी निदर्शनास आल्याने मा.कुलगुरूंच्या आदेशान्वये चौकशी समिती स्थापन करण्यात आली. सोबत चौकशी अहवालाची प्रत जोडलेली आहे.त्यावर चर्चा होवून सदर अभ्यासकेंद्र बंद करण्याबाबत आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडून शिफारस करण्यात येत आहे.) (सहपत्र क्र. 02)

**ठराव** : गोंदिया येथील विदर्भ नेचर क्यूअर सोसायटी संचालित ओशनिक व्हिजन कॉलेज ऑफ सायन्स या अभ्यासकेंद्राच्या चौकशीसाठी नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालावर सविस्तर चर्चा होवून सदर अभ्यासकेंद्रावरील शिक्षणक्रम शैक्षणिक वर्ष 2016-2017 पासून बंद करण्यात यावे तसेच विद्यार्थी हित लक्षात घेता या केंद्रावरील विद्यार्थी अन्य केंद्रावर स्थलांतरित करावे व सदर केंद्रावर दंडात्मक कार्यवाही करावी असा निर्णय घेण्यात आला.

**विषय क्रमांक बी-01/2016/03:** B.Sc.M.L.T. या शिक्षणक्रमाचे B.Sc. च्या ऐवजी B. M.L.T (Bachelor of Medical Lab Technologh) असे नामकरण (Namenclature) करण्याबाबत...

**(टिप्पणी** :- B.Sc.(MLT) हा शिक्षणक्रम आरोग्य विज्ञान विद्याशाखेंतर्गत राबविला जातो. सदर शिक्षणक्रमाचे नाव हे B.Sc.(MLT) असून UGC Committee सन 2010 च्या निर्णयानुसार सदरच्या शिक्षणक्रमाचे नाव हे B.Sc.(MLT) च्या ऐवजी B.MLT (Bachelor of Medical Lab Technology) करण्यात यावे असा बदल शैक्षणिक वर्ष 2016-2017 पासून करण्यास मान्यता मिळावी अशी शिफारस आरोग्य विज्ञान शाखा परिषदेकडे करण्यात येत आहे)

**ठराव** : B.Sc.M.L.T. या शिक्षणक्रमाचे B.Sc. च्या ऐवजी B. M.L.T (Bachelor of Medical Lab Technologh) असे नामकरण (Namenclature) करण्यास आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेमार्फत मान्यता देण्यात आली.

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक बी-01/2016/04 :** B.Sc.M.L.T. या शिक्षणक्रमाच्या पॅटर्न पध्दतीत बदल करणेबाबत...

**(टिप्पणी :-** आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या B.MLT या शिक्षणक्रमाच्या नावात बदल केल्याने (पूर्वीचे नाव B.Sc.(MLT) U.G.C.च्या नियमान्वये व CBCS च्या पॅटर्न नुसार Semister पध्दती अवलबुन सध्याच्या पॅटर्नमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. नविन पॅटर्न पध्दत स्विकारावी असा बदल शैक्षणिक वर्ष 2016-2017 पासून करण्यास मान्यता मिळावी अशी शिफारस आरोग्य विज्ञान शाखा परिषदेकडे करण्यात येत आहे) (सहपत्र क्र. 03)

**विषय क्रमांक बी-01/2016/05 :** Diploma in Pharma Manufacturing and Packing (P49) या शिक्षणक्रमाच्या पॅटर्न पध्दतीत बदल करणेबाबत...

**(टिप्पणी :-** आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या Diploma in Pharma Manufacturing and Packing या शिक्षणक्रमाच्यासंदर्भात मूल्यमापन पध्दतीत सध्या अस्तित्वात असलेल्या Seprate Passing Head ऐवजी एकत्रित पासिंग (Combine Passing – Theary and Pracatical) यांच्यासह एकुण 40% गुण उत्तीर्णतेसाठी लागु करणेबाबतचा बदल शैक्षणित वर्ष 2015-2016 अंमलात करण्यात आला आहे. यास आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेत कार्योत्तर मान्यता देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

(सहपत्र क्र. 04)

**ठराव :** Diploma in Pharma Manufacturing and Packing (P49) या शिक्षणक्रमाच्या पॅटर्न पध्दतीत बदल करण्यास आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेमार्फत मान्यता देण्यात आली.

**विषय क्रमांक बी-01/2016/07 :** Post Graduate Diploma in Hospital Health Care Management या शिक्षणक्रमाच्या पात्रता निकषात बदल करणेबाबत...

**(टिप्पणी :-** आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या Post Graduate Diploma in Hospital Health Care Management या शिक्षणक्रमास वैद्यकिय पदवीधर \ विज्ञान पदवीधर या सोबत भिन्न अभियांत्रिकी, संगणक विज्ञान शाखेतील पदवीधर अशी पात्रता असलेले प्रवेशास पात्र असत. परंतु या शिक्षणक्रमाची व्याप्ती बघता व महाराष्ट्रातील वैद्यकिय क्षेत्रात विविध विभागांमध्ये , शासकिय रूग्णालयात Bachlor in Social Work (BSW) या पदवीधारकांचे समुपदेशक म्हणून काम मोठ्या प्रमाणात व महत्वाचे आहे. सदर पदवीधारकांनाही PDGHHCM या शिक्षणक्रमास प्रवेश मिळण्याबाबत अभ्यासकेंद्रांकडून व विद्यार्थ्यांकडून सातत्याने मागणी होत आहे. PDGHHCM या शिक्षणक्रमांच्या पात्रता निकषात सदर पदवीधारकांचा Bachlor in Social Work(BSW) समावेश करावा अशी शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेला करण्यात येत आहे. (सोबत सहपत्र क्र. 06)

**ठराव :** Post Graduate Diploma in Hospital Health Care Management या शिक्षणक्रमाच्या पात्रता निकषात Bachelor in Social Work (BSW) या पात्रता धारकांचा समावेश करण्यास आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेमार्फत मान्यता देण्यात आली.



Scanned with CamScanner

**विषय क्रमांक बी-01/2016/08 :** आरोग्य विज्ञान विद्याशाखेमार्फत राबविण्यात येत असलेल्या सर्व शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्राचे नुतनीकरण शुल्काबाबत.....

(**टिप्पणी :-** आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या सर्व शिक्षणक्रमांच्या अभ्यासकेंद्रांची मान्यता ही तीन वर्षांची असते. सदर मान्यता संपल्यानंतर पुनर्नोंदणी करणे आवश्यक असते. सदर नुतनीकरण शुल्क प्रमाणपत्र शिक्षणक्रमासाठी 5000/- तसेच पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांसाठी 10000/- आकारण्याबाबत आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखेमार्फत राबविण्यात येत असलेल्या सर्व शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्राचे सुधारित नुतनीकरण शुल्कास आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेत मान्यता देण्यात आली.

**विषय क्रमांक बी-01/2016/09 :** मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी आलेले विषय.....

संचालक तथा अध्यक्ष
आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषद

Scanned with CamScanner